**<u>वैनगंगा पर्यटन महोत्सव भंडारा जिल्हयात आयोजित करावयाचा असून,</u>**

**<u>महोत्सवाची रूपरेषा ठरवितांना समावेश करावयाच्या बाबी खालीलप्रमाणे</u>**

१. महोत्सवाचे स्थळ – वैनगंगा नदीच्या तिरावर (जूना व नविन पुलाच्या मधली जागा)

२. महोत्सवाची प्रसिध्दी करणेसाठी कार्यक्रमाचे लोगो तयार करणे.

३. महोत्सवाची प्रसिध्दी करणेसाठी जिल्हयातील महत्वाच्या ठिकाणी वॉल पेंटींग करणे.

४. महोत्सवाच्या अनुषंगाने रोषनाई करणे.

५. महोत्सवाच्या अनुषंगाने विविध स्वरूपाच्या कामांसाठी वेगवेगळया समित्या स्थापन करणे.

६. महोत्सवाचे आयोजन करण्यासाठी निधीचा स्त्रोत्र निर्माण करण्यासाठी शासन स्तरावरून मिळणारे अनुदान, जिल्हयातील उद्योगधंदे, व्यापारी बँका व इतर देणगीदारांची बैठक आयोजित करणे.

७. महोत्सव आयोजनाच्या अनुषंगाने जिल्हयातील प्रत्येक तालुक्यातून जनजागृती मशाल मिरवणूक काढणे.

८. जिल्हयातील लोप पावणा-या कलांच्या लोककलावंताना त्यांच्या कलेचे सादरीकरण करणेसाठी पाचारण करणे. जसे लोकसांस्कृतिक कार्यक्रम, तमाशा, दंडार, भजन, किर्तन, लोकनृत्य इ.

९. जिल्हयातील शालेय तथा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन, विज्ञान प्रदर्शनी, सांघीक तथा एकल खेळ स्पर्धांचे आयोजन करणे.

१०. जिल्हयातील NGO जसे लोकबिरादरी व अक्षर फाउंडेशनचे कार्यक्रम आयोजित करणे

११. जिल्हयाबाहेरील तथा नामांकीत कलाकारांना पाचारन करने तथा त्यांच्या कलांचे कार्यक्रम आयोजित करणे. जसे कॉमेडी एक्सप्रेस, महाराष्ट्रातील लोककला, लोकनृत्य इत्यादी.

१२. जिल्हयात उत्पादीत होणे उत्पादन जसे भात, कोसा, लाख व बांबू यापासून निर्मित वस्तूचे स्टॉल्स लावण्याची जागा निश्चित करणे.

१३. महोत्सवादरम्यान एअर शो, लेजर शो, जिल्हयातील कलासंस्कृतीचे देखावे तयार करणे.

१४. वैनगंगा नदीपात्रात नौका रैलीचे आयोजन करणे.

१५. जिल्हयात घनदाट अरण्याने बराच भाग वेढलेला असल्याने महोत्सवादरम्यान जंगल सफारीचे आयोजन करणे.

१६. जिल्हयात तलाव तथा नदी क्षेत्र विस्तिर्ण आहे. जलक्षेत्रात उत्पादीत होणारे झिंगे व मासे यापासून तयार होणारे निरनिराळे व्यंजन हे पर्यटककांसाठी पर्वणी ठरेल, याची व्यवस्था करून त्याचा दर्जा व उपलब्धतता पर्यटककांना करून देणे.

१७. जिल्हयात भात शेती मोठया प्रमाणावर केली जाते. भातापासून निर्माण होणारे उपउत्पादने स्थानिक लोकांकडून करवून घेवून, त्यांना रोजगार व पर्यटककांना नवनविन पदार्थांचा आस्वाद घेता येईल.

१८. कार्यक्रमाची रूपरेषा आखण्यासाठी जिल्हास्तरीय समिती नेमणे.

१९. महोत्सवाच्या उदघाटनासाठी महत्वाच्या व्यक्तींना पाचारण करणे. इ.

भंडारा जिल्हयात वैनगंगा पर्यटन महोत्सव साजरा करावयाचा आहे. तरी उदयोजक , पर्यटनाशी संबधीत संस्था , सल्लागार, पत्रकार, सेवाभावी संस्था व जानकार व्यक्तीकडून सोबत दिलेल्या मुद्यांबाबत सूचना किंवा अभिप्राय मागविण्यात येत आहे.

तरी सोबत जोडलेल्या मुद्यांबाबत किंवा नविन कल्पना असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती दयावी.

संपर्क :- जिल्हा नियोजन समिती, जिल्हा नियोजन कार्यालय, भंडारा. दूरध्वनी क्रमांक 07184-252543

याच्याबद्दलचे कोणतेही अभिप्राय वा सूचना असल्यास कार्यालयीन ई-मेल dpobhandara@gmail.com यावर पाठवावे.